# दूध पिऊन ढेकर देतो! दारू-चकणा खाऊनही ढेकर देतो

# आणि दरवर्षी दुष्काळाचा तमाशा बघत बसतो

संपादकीय

जयश्री खाडिलकर-पांडे

महाराष्ट्रातील निवडणुकीची नौटंकी संपली आणि दुष्काळाचा तमाशा पाहण्यासाठी प्रेक्षक तयार झाले. दुष्काळाच्या दर्दभऱ्या कहाण्या छापून येऊ लागल्या. लहान मुली विहिरीत उतरून बाहेर येतानाचे व्हिडिओ सोशल मीडियावर दाखवले जाऊ लागले, पाण्यासाठीची वणवण 'ब्रेकिंग न्यूज' झाली. पाऊस पडेपर्यंत हे सर्व सुरू राहील. पाऊस पडला की शेतकरी कामाला लागतील. दुष्काळाच्या झळा विसरतील. पावसाचा थेंब पाहून सत्ताधारी हंसतील कारण दुष्काळाच्या आरोपातून सुटका झाली असेल. तोच पावसाचा थेंब विरोधकांना दुःखी करील कारण त्यांना आरोप करण्यासाठी दुष्काळ राहिला नसेल अधिवेशनात ओरड काय करायची हा प्रश्न त्यांच्यापुढे राहील. मग विरोधक आणि प्रसिद्धीमाध्यमे इकडेतिकडे पाहून नवीन विषय सुरू करतील. मुंबईची तुंबापुरी झाली, नागपूर पावसाने वाहून गेले. नद्यांना पूर आला, सफाई झाली नाही, नाल्यांचा प्रवाह प्लास्टिकने अडला असे विषय गाजवले जातील.

पूर्वी ऋतुनुसार पीक, पाणी, आहार ठरवला गेला तसे आता ऋतुनुसार संकटे, आरोप, प्रत्यारोप आणि हळहळ व्यक्त करीत उसासे टाकणे हे ठरून गेले आहे. सध्या उष्णता वाढल्याने उष्माघाताचे बळी हा विषयही सुरू आहे. गेली अनेक दशके न चुकता हे आरोप प्रत्यारोपाचे चक्र सुरू आहे. वर्षानुवर्षे आपण हेच चक्र बघतो आणि काहीच करीत नाही. आपण इतके निगरगट्ट झालो आहोत की, चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही गोष्टींवर आपली प्रतिक्रिया एकच असते. जगात काहीही घडले तरी आपण बदलायचे नाही. आपण प्रयत्न करायचा नाही.

दुसऱ्याला दोष द्यायचा आणि आपलं घर सांभाळत राहायचं. यातच आपण खूष असतो. म्हणजे दारू पिऊन चकणा खाऊन आपण तृप्तीची ढेकर देतो आणि दूध पिऊनही आपण ढेकर देतो.. आपल्याला फरकच



पडत नाही की, ग्लासात दूध आहे की दारू आहे. आपल्याला तृप्त वाटलं की झालं.

महाराष्ट्रात दुष्काळ नवीन आहे का? अलीकडे तर दर वर्षाआड दुष्काळाचे संकट कोसळते आहे. ऑगस्ट महिन्यात पावसाळा अधिकृतपणे संपतो त्या महिन्यातच धरणात किती पाणीसाठा आहे याची माहिती मिळते. यावरून हा पाणीसाठा किती दिवस पुरेल हेही कळते. मग त्याच महिन्यापासून पाण्याचे नियोजन का केले जात नाही? दुष्काळ पडल्यावर रेल्वे आणि टँकर सुरु करायचे, आठ-आठ दिवस पाणी बंद करायचे यापेक्षा ऑगस्ट महिन्यापासूनच कमी पाणी सोडणे, एखादा दिवस पुरवठा बंद ठेवणे हे उपाय केले तर पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी व्यवस्थित पुरेल. परंतु हे कुणीही करीत नाही. धरणातील पाणीसाठा मृत पातळीवर गेला की धावपळ सुरू होते. ऑस्ट्रेलियाच्या सिडनी शहरातील धरणात आता ५५ टक्के पाणीसाठा असतानाच त्यांनी गाड्या धुवायला एकच तास पाणी दिले जाईल, असे जाहीर केले आहे. पण भारतात असे घडतच नाही.

जे पाण्याचे तेच चाऱ्याचे आहे. आटपाडीत संपतराव पवार यांनी चारा वाळवून त्याचा विटासारख्या आकारात बाईंडिंग करण्याचे तंत्र विकसित केले. दुष्काळात चारा वाहून नेणे कठीण जाते तेव्हा या चाऱ्याच्या विटा ट्रक-टेम्पोत घालून सहजी नेता येतात आणि थेट गुरांना खाण्यास देता येतात. त्यांचे हे तंत्रज्ञान सरकारने स्वीकारावे म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले, पण सरकार ढिम्म ते ढिम्म राहिले. दर दुष्काळात चारा छावण्या उभ्या करतात आणि त्यातून भसाभसा पैसे खातात. गेल्या दुष्काळात सुरेश धस यांच्यावर चारा छावण्यांवरून गंभीर आरोप झाले. या निवडणुकीत ते भाजपाचे बीडचे स्टार प्रचारक होते.

पीक नियोजन करण्याच्याही घोषणा दुष्काळात होतात. पण उसाच्या पिकाला ठिबक सिंचनच झाले पाहिजे असा कायदा असूनही तो अंमलात येत नाही. राजू शेट्टी उसाच्या दरासाठी आंदोलन करतात तसे ठिंबक वापरा यासाठी एकाही धनदांडग्या शेतकऱ्याला दरडावत नाही. सोलापूरच्या दुष्काळी भागात मंगळवेढा आहे. ती ज्वारीची पंढरी मानतात. पण आता वाटेल तसे पाणी वळवून ज्वारी ऐवजी ऊस घ्यायला लागले आहेत. त्यांना सत्ताधारी थांबवत नाहीत. दरवेळी फक्त मंत्रालयात दुष्काळावर वॉररूम उघडली याचेच कौतुक ऐकत बसायचे. राजकारणी नालायक आहेत म्हणत आपण बोटं मोडतो. पण आपण काय आहे? आपल्या हितासाठी केलेला प्रत्येक कायदा कसा तोडायचा यातच आपले डोके चालते. 'नो एन्ट्री' दिसली की हमखास त्याच गल्लीत गाडी घालण्यात आपल्याला गौरव वाटतो. आकडे टाकून वीज चोरायची, धडाधड बोअर मारायच्या, बंगला बांधायला रात्रीत झाडं तोडून टाकायची यात आपला मोठेपणा आहे. प्लास्टिक बंदी घातली की लपवून प्लास्टिकचीच पिशवी वापरायची ही आपली कर्तबगारी असते. पाण्याचा टँकर मोफत मिळाला पाहिजे ही आपली मागणी मान्य झाली की आपण खूष असतो. मोफत काय असतं? आपल्या कमाईवर अधीभार लावून तो पैसा सरकारी तिजोरीत जमा होतो आणि त्यातून टँकरवाल्याला सरकार पैसे देते. म्हणजे आपण विकतच टँकर घेत असतो. हे करण्यापेक्षा झाडं लावली, जगवली. प्लास्टिक बंदी केली. पक्ष्यांची निगा राखली. जंगलं वाढवली तर हे प्रश्न कायमचे मिटतील. पणयासाठी आपण एक पाऊलही टाकायला तयार नसतो.

आता २३ मे पर्यंत निवडणुकीमुळे आचारसंहिता आहे. हा दिवस मावळला की काय होते ते बघा. सत्ताधारी आणि विरोधकांचे प्रचाराचे बॅनर, होर्डिंग लागतील. नेते मुलाखती देतील. दुष्काळी भागात भेट दिल्याचे फोटो झळकतील. या काळात सामाजिक संस्थांचेही पीक येते. मग या संस्था सर्वात सोप्या प्रसिद्धीचा मार्ग निवडून गावागावांत पाण्याच्या भल्यामोठ्या टाक्या वाटत सुटतात. त्या टाक्यात पाणी कुठून भरले जाणार आहे? पण वाटपाचे फोटो अल्बममध्ये लागले की निधी मागायला मोकळे. तेव्हा दुष्काळी पर्यटन २३ मे नंतर धुमधडाक्यात सुरू होईल.

दरवर्षी तेच होते. सत्ताधारी कुणीही असो आणि विरोधक कुणीही असो. सगळे एकापेक्षा एक आहेत. त्यांच्या मस्तकावर आपला शिरपेच आहे. आपल्या डोक्यावरचा पंखा चालला आणि बिस्लेरीची बाटली मिळाली की झाले. आम्ही प्लास्टिक वापरणार, लेज खाऊन पाकिटं फेकणार, झाडं तोडणार, वनांतून रस्ता काढणार, नळ सुरू ठेवून दाढी करणार, गायींना इंजेक्शन मारून दूध काढणार, वटसावित्रीच्या दिवशी वडाला ओरबाडणार, रस्त्यावरच्या एकाही झाडाला पाणी घालणार नाही, गाड्या उडवत प्रदूषण करणार आणि मग दुष्काळाचा तमाशा पाहत संवेदनशील असल्याचे नाटक करणार. हे नाटक करून कंटाळा आला की क्रिकेट आहेच.